Inq no. 1822/10
Mah no. 1514/10

[विशेष-ध. आ. (मुं. सा. वि.) २-म.

सत्यमेव जयते

74

# नोंदणीचे प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९) या अन्वये पुणे विभाग पुणे येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आलेली आहे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव चिल्ड्रन स्किल डेव्हलपमेंट फाउंडेशन मु. कडाची वाडी. गणेशनगर, चाकण. ता. खेड जि. पुणे

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक F-29086 (पुणे)

सौ. शुभांगी दत्तात्रय कड यांस प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक 18.1.2011 रोजी माझ्या सहीनिशी दिले.

शिक्का

Deputy Charity Commissioner
Pune

सही

पदनाम धर्मादाय उप आयुक्त
पुणे विभाग, पुणे

[विशेष–ध. आ. (मुं. सा. वि.) ५०-म.

№ 046034

सत्यमेव जयते

# नोंदणी प्रमाणपत्र

**संस्था नोंदणी अधिनियम, १८६०**

(१८६० चा अधिनियम २१)

नोंदणी क्रमांक : महा. 1514 /2010/पुणे
दि. 23 / 7 /10/पुणे

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, चिल्ड्रन स्किल डेव्हलपमेंट फाउंडेशन.

मु. कडाची वाडी, गणेशनगर, चाकण, ता. खेड, जि. पुणे.

खालील तारखेस संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१) अन्वये योग्यरित्या नोंदणी करण्यात आली. अर्जदार – सौ. शुभांगी दत्तात्रय कड.

तारीख : 23/7/10 . २० रोजी माझ्या सहीनिशी दिले.

Asstt. Registrar of Society
Pune Region, Pune

संस्थांचे सहायक निबंधक,
सहायक संस्था निबंधक
पुणे विभाग, पुणे विभाग.

क्र............ 358/13 कलम
दाराचे नांव :- अॅड. डी. डी. शहा
लेचा अर्ज आला तो दिनांक:-
दि.:- 51-2-2013
दिली तो दि.:-

(२)

**संस्थेचे ज्ञापन**

महा. 1514/2010/पुणे
दि. 23/7/10/पुणे

१) संस्थेचे नांव : '' चिल्ड्रन स्किल डेव्हलपमेंट फाउंडेशन ''

२) संस्थेचा पत्ता : द्वारा-सौ. शुभांगी दत्तात्रय कड, मु. कडाची वाडी, गणेशनगर, चाकण, ता. खेड, जि. पुणे

३) संस्थेचे ध्येय व उद्देश :

सहाय्यक संस्था निबंधक
पुणे विभाग, पुणे

शैक्षणिक :

१. शिक्षणाचा प्रसार व प्रचार करणे, बालवाडी, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक,इंग्रजी व मराठी माध्यम महाविद्यालय, डी.एड., बी.एड., नाईट स्कूल व महाविद्यालय, अभियांत्रिकी पदवी, पदविका अभ्यासक्रम, पॅरामेडिकल, मेडीकल अभ्यासक्रम, व्यवस्थापनशास्त्राचे अभ्यासक्रम व इतर शैक्षणिक क्षेत्रातील संस्था सुरु करणे. आयुर्वेदीक नर्सरी चालू करणे.

२. सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून अनाथ व गोरगरीबांच्या मुला-मुलींसाठी मदत करणे, विविध शिष्यवृत्त्या देणे, पुस्तकपेढी व शैक्षणिक गोष्टींची सोय करुन त्यांना मोफत पुस्तके व शालोपयोगी वस्तू पुरवणे.

निरीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय पुणे विभाग पुणे

३. साक्षरता अभियानाचा प्रचार व प्रसार करणे. विविध ठिकाणी प्रौढ साक्षरतेचे वर्ग चालवणे.

४. टेक्निकल स्कूल चालू करणे, तसेच विविध विषयांवरील इंजिनिअरींग कॉलेज सुरु करणे, सुरु असलेल्या कॉलेजेसना संलग्नता देणे, कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स, सिव्हील व इतर विषयांवर संशोधन व विकास साधणे, विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेणे.

५. गरीब व गरजू लोकांसाठी वैद्यकीय मदत करणे. वैद्यकीय शिबीरे आयोजित करणे, तसेच संस्थेच्या माध्यमातून फिरते हॉस्टिपल, तसेच सार्वजनिक वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देणे. तसेच औषधांवर संशोधन साधण्यासाठी संशोधन केंद्र स्थापन करणे, हॉस्पिटल मॅटर्निटी होम, नर्सिंग होम, मुलांचे हॉस्पिटल, ब्लड बँक, आय बँक, तसेच खेड्यामध्ये जाऊन वैद्यकीय शिबीरे आयोजित करणे व वैद्यकीय सेवा पुरविणे.य

६. अपंग, मूकबधीर यांच्यासाठी शैक्षणिक संस्था सुरु करणे, त्यांना व्यवसायाभिमुख शिक्षणाचे मार्गदर्शन देणे, शैक्षणिक साहित्याचे वाटप करणे, त्यांना आवश्यक असणाऱ्या वस्तू पुरविणे.

७. विज्ञान शिक्षणाचा दर्जा वाढावा व युवकांमध्ये वैज्ञानिक दृष्टी निर्माण व्हावी या उद्देशाने असे केंद्र स्थापन करण्याचे उद्दिष्ट संस्थेसमोर आहे. साप्ताहीक, चालू करणे.

~~८. अधिकृत खेळांच्या राष्ट्रीय व आतंरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या तालुक्यातील होतकरु खेळांडूना प्रायोजक मिळवून देणे.~~

९. तालुक्यातील नोंदणीकृत शालेय क्रीडा मंडळाच्या स्पर्धा आयोजित करणे, विविध शासकीय योजनांचा लाभ खेळाडूना मिळवून देणे.

१०. शासनाच्या सहकार्याने विविध खेळांच्या क्रीडा प्रशिक्षण शिबीर , विविध सप्ताह, युवा महोत्सव , युवक कल्याण विषयक कार्यक्रम व चर्चासत्र आयोजित करणे.

११. आर्थिक दुर्बल व गरजू विधवा आणि घटस्फोटिता महिला व त्यांच्या मुलींसाठी शाळा, कॉलेजची फी भरणे, त्यांच्या पुस्तकांसाठी आर्थिक मदत करणे.

~~१२. शालेतील राज्य , राष्ट्रीय पातळीवरील खेळाडूचा सत्कार करणे.स्कूल गेम असो. पुणे यांच्याशी संलग्नता घेणे.~~

१३. नेहरु युवा केंद्राच्या योजना ~~राबविणे.~~ व्यायामशाळा , ग्रंथालय चालविणे.

१४. त्यांना शिक्षण क्षेत्रात सर्वतोपरी मदत करुन त्यांचा सामाजिक व शैक्षणिक दर्जा उंचावण्याचा प्रयत्न करणे.

१५. आर्थिक दुर्बल, विधवा, घटस्फोटिता व इतर महिलांच्या मुलांसाठी उर्दू, मराठी, इंग्रजी माध्यमातून बालवाडी, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, तसेच उच्च माध्यमिक शाळा, टेक्निकल शाळा सुरु करणे.

१६. विधवांच्या मुला-मुलींसाठी अनाथाश्रम सुरु करणे.

सौ. शुभांगी दत्तात्रय कड — सौ. सुजाता संतोष कड — सौ. शैला अरुण कड

Asst. Charity Commissioner ★ Pune

१७. धर्मनिरपेक्ष शिक्षणांच्या प्रसाराकरीता सर्व विद्या शाखांचे बालवाडीपासून ते महाविद्यालयापर्यंत शिक्षण देण्याची सोय करणे. उदा. बालवाडी, प्राथमिक शाळा, हायस्कूल, माध्यमिक शाळा, कॉलेज, ट्रेनिंग कॉलेज, आर्टस्-सायन्स-कॉमर्स कॉलेज, प्रयोगशाळा, औषधे निर्मिती शाळा, संशोधन संस्था, वाचनालय, मेडीकल कॉलेज, विद्यापीठ, शिक्षण मंडळ व सैनिक शाळा व शेतकिय शाळा यांची निर्मिती करणे व शिक्षणाचा प्रसार करणे. त्याचप्रमाणे व्यवसायिक व तांत्रिक शिक्षणाचा प्रसार करणे त्यासाठी टेक्निकल कॉलेज, टेक्निकल विद्यापीठ यांची निर्मिती करणे, संलग्नता देणे, त्यांच्या परीक्षा घेणे व गुणपत्रके आणि प्रमाणपत्र बहाल करणे, आवश्यक वाटल्यास सरकारची परवानगी घेऊन शैक्षणिक संस्था शासनमान्यता घेऊन चालविणे. निरक्षरता दूर करण्यासाठी प्रौढ शिक्षण वर्गाची निर्मिती करणे.

१८. अनेक समविचारी संस्था, व्यक्ती यांचेशी संलग्नता करुन संस्थेचे ध्येय उद्दिष्टे राबविण्यासाठी प्रयत्न करणे.

**'' चिल्ड्रन स्किल डेव्हलपमेंट फाउंडेशन '' द्वारा-सौ. शुभांगी दत्तात्रय कड, मु. कडाची वाडी, गणेशनगर, चाकण, ता. खेड, जि. पुणे** या संस्थेच्या नियम व नियमावलीप्रमाणे ज्या कार्यकारी मंडळावर सदर संस्थेची व्यवस्था व कारभार सोपविण्यात आलेला आहे अशा कार्यकारी मंडळाच्या सभासदांची संपूर्ण नावे व पत्ते, हुद्दे, वय, व्यवसाय व राष्ट्रीयत्व खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | सभासदाचे नाव व पत्ता | हुद्दा | वय | व्यवसाय | राष्टीयत्व |
|---|---|---|---|---|---|
| १. | सौ. शुभांगी दत्तात्रय कड<br>मु. कडाची वाडी, गणेश नगर,<br>चाकण, ता. खेड, जि. पुणे | अध्यक्ष | २९ | गृहिणी | भारतीय |
| २. | सौ. सुजाता संतोष कड<br>मु. कडाची वाडी, गणेश नगर,<br>चाकण, ता. खेड, जि. पुणे | उपाध्यक्ष | २५ | गृहिणी | भारतीय |
| ३. | सौ. शैला अरुण कड<br>मु. कडाची वाडी, गणेश नगर,<br>चाकण, ता. खेड, जि. पुणे | सेक्रेटरी | २२ | गृहिणी | भारतीय |
| ४. | श्री. दत्तात्रय शिवाजी कड<br>मु. कडाची वाडी, गणेश नगर,<br>चाकण, ता. खेड, जि. पुणे | खजिनदार | ३४ | नोकरी | भारतीय |
| ५. | सौ. रजनी हनुमंत भिवरे<br>मु. पोन्हावरे, ता. शिरुर, जि. पुणे | सभासद | ४० | नोकरी | भारतीय |
| ६. | श्री. अरुण शिवाजी कड<br>मु. कडाची वाडी, गणेश नगर,<br>चाकण, ता. खेड, जि. पुणे | सभासद | २९ | नोकरी | भारतीय |
| ७. | श्री. संतोष शिवाजी कड<br>मु. कडाची वाडी, गणेश नगर,<br>चाकण, ता. खेड, जि. पुणे | सभासद | ३१ | नोकरी | भारतीय |

सौ. शुभांगी दत्तात्रय कड    सौ. सुजाता संतोष कड    सौ. शैला अरुण कड

आम्ही खाली सह्या करणारे **" चिल्ड्रन स्किल डेव्हलपमेंट फाउंडेशन "** चे सदस्य जाहीर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही एकत्र येऊन **" चिल्ड्रन स्किल डेव्हलपमेंट फाउंडेशन "** ही संस्था आज दिनांक **०५/०५/२०१०** रोजी स्थापन केली असून ती संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही या ज्ञापनावर सह्या केल्या आहेत.

| अ.क्र. | सभासदाचे नाव | सही |
|---|---|---|
| १. | सौ. शुभांगी दत्तात्रय कड | ........................ |
| २. | सौ. सुजाता संतोष कड | ........................ |
| ३. | सौ. शैला अरुण कड | ........................ |
| ४. | श्री. दत्तात्रय शिवाजी कड | ........................ |
| ५. | सौ. रजनी हनुमंत भिवरे | ........................ |
| ६. | श्री. अरुण शिवाजी कड | ........................ |
| ७. | श्री. संतोष शिवाजी कड | ........................ |

Asst. Charity Commissioner ★ Pune ★

वरील सह्या करणाऱ्यांना मी ओळखतो व त्यांनी माझ्या समक्ष त्या विधानपत्रावर / ज्ञापनावर सह्या केल्या आहेत.

स्थळ : पुणे

दिनांक : **०५/०५/२०१०**

Adv. D. D. SHAH

अॅड. ज्ञानेश डी. शहा,
आदिनाथ शॉपिंग सेंटर,
पुणे सातारा रोड, पुणे ३७
मो. नं. ९८२२४०९०५६

## प्रमाणपत्र

**" चिल्ड्रन स्किल डेव्हलपमेंट फाउंडेशन " द्वारा-सौ. शुभांगी दत्तात्रय कड, मु. कडाची वाडी, गणेशनगर, चाकण, ता. खेड, जि. पुणे** या नावाची अथवा नावात साम्य असणारी दुसरी कोणतीही संस्था पुणे जिल्ह्यात १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमानुसार नोंदणी झालेली नाही.

सौ. शुभांगी दत्तात्रय कड — सौ. सुजाता संतोष कड — सौ. शैला अरुण कड

महा./514/2010/पुणे
दि. 23/7/10/पुणे

(६) 5

सहाय्यक संस्था निबंधक
पुणे विभाग, पुणे

## परिशिष्ट 'क'

## संस्थेचे नियम व नियमावली

**संस्थेचे नांव:- " चिल्ड्रन स्किल डेव्हलपमेंट फाउंडेशन "**

**संस्थेचा पत्ता : द्वारा-सौ. शुभांगी दत्तात्रय कड, मु. कडाची वाडी, गणेशनगर, चाकण, ता. खेड, जि. पुणे**

**१. नियमावलीतील संदर्भीय शब्दांची व्याख्या :**

अ. संस्था - संस्था म्हणजे संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मु. सा. वि. व्य. अधिनियम १९५० अन्वये नोंदविण्यात येणारी संस्था होय.

ब. उद्देश - ज्ञापनातील कलम ३ खाली येणारे उद्देश

क. सभासद - संस्थेचे सभासद म्हणजे नियम व नियमावलीनुसार प्रवेश दिलेली व्यक्ती व जिने आपल्या सभासदत्वाची वर्गणी दिलेली आहे.

ड. कार्यकारी मंडळ - संस्थेचे कार्यकारी मंडळ म्हणजे संस्थेच्या नियम व नियमावलीनुसार संस्था ज्यांचेवर संस्थेचे व्यवस्थापन सोपविले आहे असे मंडळ.

**२. संस्थेचे कार्यक्षेत्र :** संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य असे राहील.

**३. हिशोबाचे वर्ष :** संस्थेचे हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.

Asst. Charity Commissioner Pune

**४. सभासदत्व व त्याची नोंदणीची पद्धत :**

संस्थेचे ध्येय धोरण व उद्देश मान्य असलेल्या कोणत्याही १८ वर्षे पूर्ण केलेल्या व्यक्तीस संस्थेचे सभासद होता येईल. सभासद होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीने संस्थेकडे असणारा नमुना अर्ज भरुन अध्यक्ष, सेक्रेटरी यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. त्यास योग्य मंजुरी मिळाल्यानंतर अर्जदार व्यक्तीस सभासदाचे हक्क प्राप्त होतील. सभासदत्व मंजुरी करण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

**५. सभासदांचे प्रकार :** १) आजीव सभासद (२) सामान्य सभासद (३) संस्थापक सभासद

१) आजीव सभासद :

जी व्यक्ती संस्थेस एकरकमी रु. १०००/- देईल तीस "आजीव सभासद" असे संबोधण्यात येईल.

२) सामान्य सभासद :

जी व्यक्ती संस्थेस प्रतिवर्षी एकरकमी रु. १२०/- देईल तीस "सामान्य सभासद" असे समजणेत येईल.

३) संस्थापक सभासद :

संस्थेच्या ज्ञापनात पहिले कार्यकारी मंडळ म्हणून ज्यांची नावे नमूद केली आहेत त्यांना संस्थापक सभासद समजणेत येईल व त्यांना वार्षिक वर्गणी रु. १००/- भरावी लागेल.

**६. सभासदत्व रद्द होणे :**

१. एखाद्या सभासदाचा मृत्यू झाल्यास
२. सभासदाने राजीनामा दिल्यास
३. सभासदास फौजदारी वा नैतिक अध:पतनाच्या गुन्ह्याबद्दल शिक्षा झाल्यास.
४. सभासदाची वागणूक संस्थेच्या ज्ञापन व नियम व नियमावलीचे विरुद्ध तसेच संस्थेच्या हिताविरुद्ध असल्यास
५. कार्यकारी मंडळाने विहीत केलेल्या वेळेत वार्षिक वर्गणी न दिल्यास

वरीलप्रमाणे कोणत्याही कारणास्तव सभासदाचे सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

| | | |
|---|---|---|
| सौ. शुभांगी दत्तांत्रय कड | सौ. सुजाता संतोष कड | सौ. शैला अरुण कड |

**७. सर्वसाधारण सभा, तिचे अधिकार आणि तिचे कार्य :**

संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे वर्ष संपलेपासून सहा महिन्याचे आत कार्यकारी मंडळाने घेतली पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत वार्षिक सभा वर्ष संपलेपासून सहा महिन्याचे आत झाली नाही तर २/३ सभासदांनी लेखी अर्ज केल्यास, संस्थापकृ यांनी आपल्या अधिकारात सभाबोलाविली नाही तर एकूण सभासदांच्या ३/५ सभासदांनी एकत्र येऊन अशी सभा घेण्याबद्दल योग्य तो निर्णय घेऊ शकतील व त्यानुसार होणाऱ्या सभेतील ठराव संस्थेवर बंधनकारक राहतील.

संस्थेच्या सर्वसाधारण सभेची खालीलप्रमाणे कामे राहतील –

१. मागील सभेचा वृत्तांत, कार्यकारी मंडळाने सादर केलेला जमाखर्च, ताळेबंद अंदाजपत्रक मंजूर करणे

२. कार्यकारी मंडळाची निवड करणे

३. पुढील वर्षासाठी हिशोब तपासनीसाची नियुक्ती करणे

४. नियम व नियमावलीमध्ये दुरुस्ती असल्यास त्यास मान्यता

५. ध्येय धोरण व कार्य यांची चर्चा करणे

६. आयत्या वेळी आलेल्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे

**८. सर्वसाधारण सभेची सूचना व गणसंख्या :**

१. कार्यकारी मंडळाने ठरविलेल्या दिवशी, वेळी व ठिकाणी सर्वसाधारण सभा भरविण्यात येईल.

२. वार्षिक सभेची नोटीस सभेपूर्वी १५ दिवस अगोदर संस्थेचे सर्व सभासदांना (यु.पी.सी.) किंवा हस्तदेय पोच घेऊन देणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणाने एखाद्या सभासदास नोटीस मिळाली नाही तर त्याचा परिणाम सभेवर होणार नाही किंवा सभेत घेतलेल्या निर्णयावर होणार नाही.

३. संस्थेला खरोखरी उपयोगी होतील अशा व्यक्तींना निमंत्रित व निरिक्षक म्हणून कार्यकारी मंडळास बोलविता येईल.

४. सभेची गणसंख्या, संस्थेच्या सभासद संख्येच्या ३/५ इतकी राहील. परंतु गणसंख्या अभावी तहकूब झालेली सभा लगेच अर्ध्या तासाने बोलविली जाईल व अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.

**९. विशेष सर्वसाधारण सभा व तिची कार्ये :**

कार्यकारी मंडळास सर्व सभासदांपुढे एखादी महत्वाची गोष्ट ठेवावयाची असल्यास अगर एखाद्या विशेष प्रसंगी सर्वसाधारण सभा घेता येईल. त्यावेळी वार्षिक सर्वसाधारण सभेचे सर्व नियम पाळण्यात येतील. तसेच पटावरील २/३ सभासदांनी लेखी अर्ज केल्यास जादा सर्वसाधारण सभा अध्यक्षांनी बोलविली पाहिजे.

**१०. संस्थेचे कार्यकारी मंडळ, पदाधिकारी व त्यांची रचना :**

१. संस्थेचे कार्यकारी मंडळ कमीत कमी ७ व जास्तीत जास्त ९ सभासदांचे राहील.

२. कार्यकारी मंडळात अध्यक्ष, उपाध्यक्ष, सेक्रेटरी, खजिनदार, असे पदाधिकारी बाकीचे सभासद राहतील.

३. पदाधिकारी हे निवडून आलेले कार्यकारी मंडळ, त्यांच्यातून निवडतील.

**११. कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणुकीची पद्धत :**

१. ~~सदर अध्यक्ष व सेक्रेटरी हे पद कायम राहील व बाकी~~च्या कार्यकारी मंडळाच्या पदांची निवड दर ५ वर्षानी केली जाईल.

२. कार्यकारी मंडळाच्या पदांची निवड दर ५ वर्षांनी वार्षिक सर्वसाधारण सभेत बहुमताने करण्यात येईल.

३. एखादा ट्रस्टी मयत झाल्यास किंवा निघून गेल्यास त्याची जागा बाकीचे ट्रस्टी भरतील.

Assl. Charity Commissioner Puna

सौ. शुभांगी दत्तात्रय कड

सौ. सुजाता सतोष कड

सौ. शैला अरुण कड

## १२. कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कार्ये :

अध्यक्ष :

१. वार्षिक सर्वसाधारण सभा, विशेष सर्वसाधारण सभा व कार्यकारी मंडळातील सभेचे अध्यक्षपद स्वीकारुन नि:पक्षपणे सभा पार पाडणे

२. समसमान मत विभागणी झाल्यास निर्णायक जादा मत देणे

३. सेक्रेटरी यांनी संस्थेचे कामकाज सुरळीत व नियमित पार पाडले नाही तर स्वत:च्या अधिकारात कार्यकारी मंडळाची, वार्षिक सर्वसाधारण सभा बोलाविणे

४. संस्थेच्या कार्यावर/कारभारावर देखरेख ठेवणे

५. संस्थेच्या कागदपत्रावर सह्या करणे

उपाध्यक्ष :

१. अध्यक्षांचे अनुपस्थितीत अध्यक्षांची सर्व कामे करणे. संस्थेच्या सभांचे अध्यक्षस्थान भूषविणे अशा सभेत त्यांना समसमान मते पडल्यास जादा मत देण्याचा अधिकार राहील.

उपाध्यक्ष :

१. अध्यक्षांना त्यांच्या दैनंदिन कामकाजात मदत करणे

सेक्रेटरी :

१. संस्थेच्या ध्येयधोरणानुसार व कार्यकारी मंडळाच्या सुचनेनुसार संस्थांचे दैनंदिन कामकाज पहाणे

२. संस्थेचा पत्रव्यवहार व दप्तर सांभाळणे

३. वेळच्या वेळी कार्यकारी मंडळाच्या व संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभा अध्यक्षांना पूर्वपरवानगीने बोलविणे, त्याचा वृत्तांत ठेवणे.

४. कार्यकारी मंडळ व संस्थेचा नोकरवर्ग यांचा दुवा म्हणून संबंध ठेवणे व त्यांचे दैनंदिन कामावर देखरेख ठेवणे संस्थेचा कायदेशीर प्रतिनिधी म्हणून काम पहाणे

खजिनदार :

१. संस्थेत जमा होणारा निधीचा हिशोब सुव्यवस्थित ठेवणे जमाखर्चाचा हिशोब ठेवणे

२. मासिक व वार्षिक अंदाजपत्रक तयार करुन कार्यकारी मंडळापुढे ठेवणे

३. हिशोब, ताळेबंद पत्रक वगैरे तयार करणे

४. संस्थेच्या किरकोळ खर्चासाठी खजिनदार यांचेकडे रु. ३००/- मात्र ठेवण्याचे अधिकार राहतील.

**सभासद :** संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सभांना वेळोवेळी हजर राहून संस्थेच्या कामात मदत करणे

## १३. कार्यकारी मंडळाची सभा व मागणीच्या सभा :

१. कार्यकारी मंडळाची सभा तीन महिन्यातून एक वेळ तरी बोलविली पाहिजे. अध्यक्ष यांचे गैरहजेरीत उपाध्यक्ष हे कामकाज पाहतील.

२. कार्यकारी मंडळाच्या २/३ सभासदांनी लेखी अर्ज केल्यास किंवा कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांपुढे एखादी महत्वाची गोष्ट ठेवायची असल्यास अगर एखाद्या विशेष प्रसंगी कार्यकारी मंडळाची विशेष सभा अध्यक्ष बोलवितील. अशा सभेस मागणीची सभा संबोधण्यात येईल.

## १४. कार्यकारी मंडळाचे सभेची सूचना व गणसंख्या :

१. कार्यकारी मंडळातील सर्व सभासदांना सभेची नोटीस सभेच्या दिनांकाच्या ७ दिवस अगोदर पोस्टाने (यु.पी.सी.) किंवा हस्तदेय पद्धतीने दिली पाहिजे.

Skad — सौ. शुभांगी दत्तात्रय कड | Skad — सौ. सुजाता संतोष कड | Skad — सौ. शैला अरुण कड

Asst. Charity Commissioner ★ Pune ★

२. विशेष प्रसंगी कार्यकारी मंडळाची सभा न घेता परिपत्रकान्वये सभा घेण्यात येईल. तथापि अशा सभेतील सर्व निर्णय हे एकमताने झाले पाहिजेत. जर एकमताने अशा सभेतील निर्णय न झाल्यास सदरहू निर्णयासाठी पुढील सभेत विषय मांडण्यात येईल.

३. कार्यकारी मंडळाने सभेत एकूण ३/५ सभासदांची उपस्थिती ही गणसंख्या मानण्यात येईल. तथापि गणसंख्येअभावी सभा तहकूब झालेली सभा लगेच अर्ध्या तासाने बोलविली पाहिजे. सदरहू गणसंख्येने बंधन राहणार नाही.

**१५. कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचे नियम :**

१. ~~सदर अध्यक्ष व सेक्रेटरी हे पद कायम राहील व बाकीच्या~~ कार्यकारी मंडळाच्या पदांची निवड दर ५ वर्षांनी वार्षिक सर्वसाधारण सभेत करण्यात येईल. निवडणुकीची सर्व व्यवस्था अस्तित्वात असलेले कार्यकारी मंडळ करील. आवश्यकता असल्यास त्यासाठी निवडणुकीचे नियम तयार करतील.

२. ज्यावर्षी निवडणूक असेल त्या वर्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे नोटीसीमध्ये तसा स्पष्ट उल्लेख करण्यात येईल व उमेदवारी अर्ज मागविण्यात येतील.

३. कार्यकारी मंडळाची निवडणूकीची पद्धत ठरविण्याचा अधिकार त्यावेळी अस्तित्वात असलेले कार्यकारी संस्थापकास राहील.

**१६. कार्यकारी मंडळातील रिक्तपद भरण्याबाबत :**

कार्यकारी मंडळातील कोणत्याही कारणाने मुदतपूर्व रिकामी झालेली जागा, कार्यकारी मंडळातील राहिलेले अन्य सदस्य, उर्वरित मुदतीकरीता इतर सभासदांकडून स्विकृत सभासद घेऊन भरतील व तसा बदल अर्ज विहित नमुन्यात मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पुणे क्षेत्र यांना सादर करतील.

**१७. कार्यकारी मंडळाचे कार्य व अधिकार :**

१. संस्थेकरीता देणगी, अनुदान, वर्गणी, मृत्यूपत्राने अथवा बक्षिसपत्राने अथवा अन्य पद्धतीने मिळणारी मिळवत, विनाअट किंवा योग्य अटींसह स्विकारणे अथवा नाकारणे.

२. संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहणक, नोकर वर्गाची नियुक्ती करणे. त्यांचे सेवाशर्तीचे नियम ठरविणे. संस्थेच्या देण्याघेण्याचे व्यवहार पहाणे, नवीन उपसमित्या नेमणे, संस्थेच्या ध्येय धोरणानुसार काम पहाणे

३. हिशोब तपासनीसाकडून जमाखर्च व ताळेबंद पत्रक तयार करून घेऊन वार्षिक सभा घेणे संस्थेचे हिशोब सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमातील तरतुदीनुसार ठेवून त्याचे परिक्षण चार्टर्ड अकौंटंट अगर पब्लिक ऑडिटरकडून करवून घेऊन विहित नमुन्यात मा. संस्था निबंधक, पुणे यांचे कार्यालयात दरवर्षी नियमित पाठविणे

४. संस्थेची पुढील कार्याची दिशा व अंदाजपत्रक तयार करणे.

५. वार्षिक सभेने केलेले ठराव, आदेश व धोरणात्मक गोष्टी अंमलात आणणे.

६. संस्थेच्या नियम व नियमावलीमध्ये दुरुस्ती, नवीन नियम अगर इतर शिफारशी वार्षिक सभेत करणे.

७. संस्थेच्या उद्दिष्टांशी अनुरुप असलेल्या इतर संस्थांचे आर्थिक व इतर प्रकारचे सहाय्य मिळविणे.

**१८. संस्थेचे निधी, मिळकत व विनियोग :**

सभासद वर्गणी, देणग्या, शासकीय व निमशासकीय अनुदान, कायदेशीर मार्गाने व्याजी/बिनव्याजी कर्ज, वित्तीय संस्थांकडून अनुदान इ. संस्थेचा असे निधी समजण्यात येईल. सदरहू निधीचा विनयोग संस्थेच्या उद्देशावर केला जाईल.

**१९. उद्दिष्टनिहाय खर्चाची तरतूद :**

संस्थेच्या दर वर्षेप्रमाणे येणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक उद्दिष्टांसाठी २०%, शैक्षणिक उद्दिष्टांकरीता ४०%, आरोग्यविषयक

**सौ. शुभांगी दत्तात्रय कड** **सौ. सुजाता सतोष कड** **सौ. शैला अरुण कड**

उद्दिष्टांकरीता २५% त्याप्रमाणे संस्थेच्या व्यवस्थापनासाठी १५% खर्चाची तरतूद वर दाखवल्याप्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| ज्ञापनातील उद्देशासाठी | ८५% |
| व्यवस्थापकीय उद्देशासाठी | १५% |
| | ----- |
| एकूण | १००% |

उद्दिष्टनिहाय खर्चाचे टक्केवारीत बदल करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

**२०. कर्ज किंवा ठेवी या संबंधी तरतूद :**

संस्थेस कायदेशीर मार्गाने कर्ज किंवा ठेवी घेता येतील. त्यापूर्वी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ३५ व ३६ प्रमाणे मा. सह धर्मादाय आयुक्त पुणे विभाग, पुणे यांची रितसर लेखी परवानगी घेण्यात येईल.

**२१. स्थावर मालमत्ता खरेदी व विक्री करणे संबंधी तरतूद :**

संस्थेस योग्य वाटल्यास आवश्यक स्थावर मिळकत खरेदी करता येईल. तसेच संस्थेची मालमत्ता विकता येईल. त्याबाबतचा संपूर्ण अधिकार कार्यकारी मंडळास राहील. परंतु त्यासाठी संस्थेच्या कार्यकारी मंडळाला मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम व्यवस्था १९५० चे कलम ३६ अन्वये पूर्तता करुन मा. सह धर्मादाय आयुक्त, पुणे यांची रितसर परवानगी घेण्यात येईल.

**२२. बँक खाते :**

संस्थेचा निधी राष्ट्रीयकृत बँकेत अथवा शासनाने मान्यता दिलेल्या बँकेत संस्थेच्या नावे खाते उघडून ठेवला जाईल. पैसे देण्याचा अगर काढण्याचा व्यवहार हा संस्थेचे अध यक्षांची सही कायम राहील तसेच सेक्रेटरी व खजिनदार यांचेपैकी कोणत्याही दोघांच्या संयुक्त सहीने करण्यात येईल.

**२३. सभासदांची यादी ठेवण्याची पद्धत :**

१. संस्थेच्या नोंदणी कायदा १८६० चे कलम १५ नुसार व १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियमातील नियम १५ प्रमाणे अनुसूची ६ चे नमुन्यात सभासदांची यादी ठेवण्यात येईल.

२. संस्था नोंदणी कायदा १८६० चे कलम ४ प्रमाणे व संस्था नोंदणी कायदा महाराष्ट्र १९७० चे कलम ७ प्रमाणे अनुसूची १ च्या नमुन्यात दरवर्षी कार्यकारी मंडळाची यादी मा. सहाय्यक संस्था निबंधक, पुणे यांचे कार्यालयात पाठविण्यात येईल.

३. संस्था नोंदणी कायदा १८६० चे कलम ४ अ प्रमाणे संस्था नोंदणी कायदा महाराष्ट्र १९७१ चे नियम ८ प्रमाणे दरवर्षी संस्थेत नोकरीस लागलेल्या व्यक्तींच्या नोकरीसंबंधी अटीबाबतचे विवरणपत्र अनुसूची २ चे नमुन्यात मा. सहाय्यक निबंधक पुणे यांचेकडे पाठविणेत येईल.

**२४. संस्थेचे नाव किंवा उद्देशात बदल :**

संस्थेचे नाव किंवा उद्देशात बदल करावयाचा असेल अथवा दोन संस्थांचे विलीनीकरण करावयाचे असेल तर सन १८६० च्या संस्था नोंदणी कायद्यातील कलम १२ किंवा १२ अ यातील असणाऱ्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

**२५. नियम आणि नियमावलीत बदल करण्याची तरतूद मा. सहाय्यक संस्था निबंधक व सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्या परवाणगीने :-**

कार्यकारी मंडळाने अगर बहुसंख्य सभासदांनी रचालू नियम व नियमावलीत दुरुस्ती सुचवली असेल तर वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या ३/५ बहुमताने असा ठराव मंजूर करण्यात येईल. मात्र घटना, नियम व नियमावलीचा दुरुस्तीचा मसुदा प्रत्येक सभासदास नोटीसीबरोबर पाठविला जाईल. तसेच कुठल्याही प्रकारचा बदल नावात/ज्ञापनात/नियमावलीत

Asst. Charity Commissioner ★ Pune ★

सौ. शुभांगी दत्तात्रय कड | सौ. सुजाता संतोष कड | सौ. शैला अरुण कड

करायचा झाला प्राप्तीकर अधिकार याच्या माहिती साठी सुद्धा एक प्रत त्यांना दिली जाईल.

**२६. संस्थेचे विसर्जन :**

संस्था विसर्जन करावयाची झाल्यास ३/५ बहुमताने सर्वसाधारण सभेत मंजुरी घ्यावी लागेल व संस्था नोंदणी सन १८६० चे अधिनियमातील कलम १३ व १४ प्रमाणे संस्था विसर्जनाची कार्यवाही करण्यात येईल. संस्था विसर्जित करावयाची झाल्यास त्या उर्वरीत मिळकत/पैसे सर्व देणे वगळता जी काही रक्कम राहील ती ज्याच्यात साम्य उद्देश असतील आणि जी १२ (अ) प्रमाणे प्राप्तीकर अधिकारी यांच्याकडे नोंद करण्यात येतील कोणत्याही परिस्थितीत राहीलेले पैसे सभासदांना देण्यात येणार नाहीत.

**दाखला**

असे प्रमापणत करण्यात येते की, **" चिल्ड्रन स्किल डेव्हलपमेंट फाउंडेशन " द्वारा-सौ. शुभांगी दत्तात्रय कड, मु. कडाची वाडी, गणेशनगर, चाकण, ता. खेड, जि. पुणे** या संस्थेच्या नियम व नियमावलीची ही खरी व सत्य प्रत आहे.

स्थळ : पुणे

दिनांक : ०५/०५/२०१०

सौ. शुभांगी दत्तात्रय कड | सौ. सुजाता सतोष कड | सौ. शैला अरुण कड

सही शिक्याची खरी नक्कल

11/2/2013

अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय पुणे विभाग पुणे

Asst. Charity Commissioner ★ Pune ★